माझे नाव अविनाश माणिकचंद जिंतूरकर आहे. सदर शपथपत्रातील मजकूर मी वाचला असून तो माझ्या वकीलांनी मला समजावून सांगितला आहे. शपथपत्रावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा आहे.

**<u>सामनेवाला यांचा साक्षीदार उलटतपास तक्रारदारातर्फे विधीज्ञ श्री. जी. एस. तेलंग्रे यांचेमार्फत सुरु</u>**

१६. मी सामनेवाले क्र.१ यांचेकडे प्राचार्य म्हणून डिसेंबर–२०२२ साली रुजू झालो. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळी तक्रारदारांची भरती झाली त्यावेळी मी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाले क्र.२ यांचा करार ३१/०३/२०१६ रोजी संपलेला होता परंतु प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने त्यास मुदतवाढ देण्यात आली. म्हणून तक्रारदार कर्मचारी हे काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की या प्रकरणात अंतरिम आदेश पारीत होवून सामनेवाले यांना न्यायालयाने आदेशीत केले होते की, तक्रारदार यांना काम दयावे व वेतन अदा करावे. एकुण तक्रारदारापैकी चार तक्रारदार हे मयत आहेत व उर्वरित तीन पैकी श्री. मिसाळ यांना काम देण्यात येत आहे. उर्वरीत दोन तक्रारदारांना सामनेवाले क्र.२ यांनी कामावरुन काढून टाकलेले आहे त्यामुळे आम्ही त्यांना काम देवू शकलो नाही. अंतरिम आदेश झाल्यानंतर तक्रारदार यांना सामनेवाले क्र.१ यांनी पत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अंतरीम आदेश झाल्यानंतर तक्रारदार श्री केवटे व श्री गायकवाड यांनी सामनेवाले क्र.१ यांना पत्र देवून विंनती केली की त्यांना काम दयावे. साक्षीदार स्वतः सांगतो मी, सामनेवाले क्र.१ यांनी सामनेवाले कं.२ यांना कॉन्ट्रॅक्ट दिले असल्याने व आम्ही नेमणूक अधिकारी नसल्याने त्याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही. सामनेवाले क्र.१ ही शैक्षणीक संस्था असल्याने ती उद्योग या संज्ञेत मोडत नाही कारण ती ना नफा ना तोटा या तत्वावर चालते.

१७. प्रवेश घेण्यापुर्वि विद्यार्थ्यांकडून आम्ही फी आकारतो व ती शासनाकडे जमा करतो. हे म्हणणे खरे आहे की शासनामार्फत आमचा पगार केला जातो. हे मला सांगता येंणार नाही की, ज्यावेळी सामनेवाले क्र.१ यांनी पुरवढादाराची जाहिरात दिली होती त्यावेळेस किती अर्ज आले होते. हे मला माहित नाही की सामनेवाले क्र.२ हे सुरक्षारक्षक बोर्डाकडे नोंदणीकृत आहेत की नाहीत. आमच्याकडे दोन प्रकारचे सुरक्षारक्षक आहेत एक–

कंट्राटदारामार्फत घेतलेले व दुसरे थेट सेक्युरिटी गार्ड बोर्डाकडून घेतलेले. जे सेक्युरिटी गार्ड बोर्डाकडून घेतलेल सुरक्षारक्षक आहेत त्यांना सुमारे रु.२५०००/— वेतन अदा केले जाते. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदार हे सेक्यूरिटीगार्ड बोर्डाकडून घेतलेल्या सुरक्षारक्षकाचे रिलीव्हर आहेत. हे म्हणणे खरे आहे की दोन्ही प्रकारचे सुरक्षारक्षक हे आठ तास काम करतात. तक्रारदारांच्या वेतनापोटी सामनेवाले क्र.२ यांना २०१६ पासून आजपर्यंत रु.७०००/— प्रमाणे आम्ही वेतन देतो. हे म्हणणे खरे नाही की सेक्युरिटी गार्ड बोर्डाचे सुरक्षारक्षक यांची डयुटी आमच्या सहीने लागते. आता मला नि.क्र.यु—१० वरील पान क्र.३ ते १५ वरती प्राचार्यांची सही आहे. हे मला आता सांगता येणार नाही की दुस—या कोणत्याही सेक्युरीटी ऐजन्सी मार्फत जाहिरातीस अनुसरुन कोणतेही कोटेशन आमच्याकडे आले नाही. हे म्हणणे खरे नाही की सेक्युरीटीगार्ड बोर्डच्या परवानगी शिवाय इतर कोणतेही सुरक्षारक्षक घेवू शकत नाहीत. २०२५ साली शासनाने जि.आर. काढून सेक्युरिटी गार्ड बोर्डाचाच सुरक्षारक्षक नेमावा असे निर्देश दिलेत. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार यांचे वेतन किमान वेतनापेक्षा कमी होते व ही बाब करारानुसार दिसून येते. हे म्हणणे खरे आहे सामनेवाले क्र.२ यांचे कोणतेही सुपरवायझर देखरेखी साठी सामनेवाले क्र.१ यांच्याकडे येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की तक्रारदार हे जे काम करतात ते व्यवस्थीत करतात की नाहीत हे पहाण्याची जबाबदारी आमची आहे. हे म्हणणे खरे नाही की तक्रारदार हे सामनेवाले क्र.१ यांचेच कर्मचारी आहेत तरी सुध्दा त्यांना कायमस्वरुपाचे फायदे मिळू नयेत म्हणून बनावट करार आम्ही सामनेवाले क्र.२ यांच्याशी केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपासणी पुर्ण.

फेरतपासणी काही नाही.

साक्षीदारास मुक्त करण्यात येते.

श्रवणोत्तर स्विकृत माझे समक्ष

**दि. १६/०२/२०२६** सही/—
**स्थळ —औरंगाबाद** **(सं.धों. सुर्यवंशी)**
**सदस्य,**
**औद्योगिक न्यायालय, औरंगाबाद**